महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक : १४४२/गट-क संयुक्त-क.स/२०२२/२४ दिनांक:- १४ सप्टेंबर, २०२३

## -: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय :- महाराष्ट्र गट- क सेवा (मुख्य) परीक्षा-२०२२**
लिपिक- टंकलेखक (मराठी व इंग्रजी) व कर सहायक या संवर्गाच्या सर्वसाधारण गुणवत्ता याद्या, तात्पुरत्या निवड याद्या व भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याच्या (Opting Out) सुविधेबाबत

**संदर्भ :-** १) जाहिरात क्रमांक - ११३/२०२२
२) जाहिरात क्रमांक - ११५/२०२२

महाराष्ट्र गट-क सेवा (मुख्य) परीक्षा -२०२२ मधील लिपिक- टंकलेखक (मराठी व इंग्रजी) व कर सहायक या संवर्गाच्या सर्वसाधारण गुणवत्ता याद्या व तात्पुरत्या निवड याद्या आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आल्या असून त्याआधारे उमेदवारांकडून भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा (Opting Out) विकल्प मागविण्यात येत आहे.

२. सदर तात्पुरत्या निवड याद्या व सर्वसाधारण गुणवत्ता याद्या या निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाच्या असून उमेदवारांच्या अर्जामधील आरक्षणाविषयक व इतर दाव्यांच्या अनुषंगाने अंतिम निकालापूर्वी पडताळणीअंती काही उमेदवारांच्या दाव्यांमध्ये/ शिफारशीमध्ये बदल होऊ शकतो.

३. प्रस्तुत पदांच्या अधिसूचनेतील परि.क्र ८.५ नुसार आयोगामार्फत घेण्यात आलेल्या टंकलेखन कौशल्य चाचणीत अर्हताप्राप्त/पात्र ठरलेल्या उमेदवारांचाच (दिव्यांग, माजी सैनिक व अनाथ उमेदवार वगळता) सदर सर्वसाधारण गुणवत्ता याद्या व तात्पुरत्या निवड याद्यांमध्ये समावेश करण्यात आला आहे.

४. प्रस्तुत सर्वसाधारण गुणवत्ता याद्या व तात्पुरत्या निवड याद्या मा. न्यायालया / मा. न्यायाधिकरणामध्ये येथे दाखल विविध न्यायिक प्रकरणांमधील न्यायनिर्णयाच्या अधीन राहून प्रसिध्द करण्यात येत आहेत.

५. प्रस्तुत परीक्षेच्या भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याचा (Opting Out) विकल्प सादर करण्याकरीता आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील 'ONLINE FACILITIES' या मेनूमध्ये 'Post Preference / Opting Out' वेबलिंक उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सदर वेबलिंक दिनांक १५ सप्टेंबर, २०२३ रोजी १२.०० वाजेपासून दिनांक २१ सप्टेंबर, २०२३ रोजी २३.५९ वाजेपर्यंत सुरु राहील.

६. ऑनलाईन पध्दतीखेरीज अन्य कोणत्याही प्रकारे पाठविलेला भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा पर्याय ग्राहय धरला जाणार नाही. तसेच याबाबत उमेदवारांची कोणतीही बाब / निवेदने / पत्रव्यवहार तद्नंतर विचारात घेतली जाणार नाहीत.

७. भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याच्या (Opting Out) विकल्पाआधारे अंतिम निकाल / शिफारशीसंदर्भात कार्यवाही करण्यात येईल. तसेच भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याचा विकल्प निवडणा-या उमेदवारांचा अंतिम निकाल प्रक्रियेत समावेश करण्यात येणार नाही.

८. भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याचा (Opting Out) विकल्प सादर करण्यास कोणत्याही प्रकारची तांत्रिक अडचण उद्भवल्यास आयोगाच्या १८००-१२३४-२७५ किंवा ७३०३८२१८२२ या टोल फ्री क्रमांकावर अथवा Support-online@mpsc.gov.in या ई-मेल आयडीवर विहित कालावधीत संपर्क साधता येईल.

**उप सचिव (परीक्षोत्तर-अराजपत्रित)**

**ठिकाण – नवी मुंबई** **महाराष्ट्र लोकसेवा आयोग, नवी मुंबई**